

# पर्यावरण रक्षणासाठी

पृथ्वीवरील सजीव सृष्टी आज गंभीर संकटाला सामोरे जात आहे. लोप पावत चाललेली जैवविविधता, नष्ट होणारे प्रजाती आणि परिसंस्थेचा ऱ्हास थांबविण्यासाठी सक्रिय निर्णयांची आवश्यकता आहे. आपण रोज वेगवेगळ्या ठिकाणी अनेकविध कारणासाठी निर्णय घेतो. त्यामध्ये काही निर्णय विचार करून घेतो तर काही न करता निर्णय घेतो. परंतु पर्यावरण संवर्धनात घेतले जाणारे निर्णय खूप जोखीमेचे असतात. अनेकदा गोंधळात टाकणारे असतात. उदाहरणार्थ नामशेष होण्याचा धोका असलेल्या प्रजातीला कसे वाचवायचे? स्थानिक लोकांच्या गरजांचाही विचार करून तिथली प्रजाती आणि परिसंस्थांचे रक्षण कसे करावे? देखरेख कशी थांबवायची आणि निश्चित उपाय कधी अंमलात आणायचे? यासारखे वेगवेगळे घटक सामावलेले आहेत.

पर्यावरण संरक्षणात समस्या सोबत आव्हाने देखील तितकीच तीव्र आहेत. यामध्ये प्रत्येक घटकाची भिन्न मूल्ये दडलेली असून, उपयोगात आणले जाणारे पर्याय गुंतागुंतीचे असून दुर्मिळ संसाधने व अनिश्चितता देखील सामावली आहे. लोकांचा दबाव, संवर्धन कामासाठी आवश्यक असणारा पण अपुरे आर्थिक नियोजन आणि सामाजिक पाठबळ. अशा आव्हानात्मक निर्णयांना सामोरे जाताना आपण ज्या जलद पद्धतीने निर्णय घेतो, तो अनेकदा असफल होताना पाहतो. परिणामी योग्य निर्णय घेण्यास उशीर होतो, कोणताही पर्याय निवडुन त्यामधून पुष्कळ चांगल्या गोष्टींची आशा बाळगतो. प्रजाती आणि परिसंस्था व्यवस्थापित करण्यासाठी ही धोरणे अवलंबल्याने वाईट परिणाम होऊ शकतात. उदाहरणार्थ, आज करूया उद्या करूया पुढील खेपेस करूया अशा नियोजनात संकटग्रस्त प्रजाती नामशेष

होऊ शकतात किंवा अकार्यक्षम उपाय योजनांवर निधी वाया जाऊ शकतो. मग काय करता येईल? कन्झर्वेशन बायोलॉजी या नियतकालिकेत प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधात शास्त्रज्ञानी असे सुचविले की पर्यावरण रक्षणासाठी घेण्यात येणारे निर्णय विज्ञानातील सिद्धांत, रचना आणि साधनांच्या मदतिने करता येतील. निर्णय विज्ञान विचारांची रचना करते जेणेकरून निर्धार माहितीपूर्ण, पारदर्शक आणि संरक्षणात्मक असतील. निवडलेले पर्याय इच्छित परिणाम प्राप्त करण्याची अधिक शक्यता असते. निसर्ग संवर्धनासाठी निर्णयशास्त्र नवीन नाही, पण त्यात अडथळे नेहमीचेच आहेत. जसे प्रशिक्षणाचा अभाव, क्लिष्ट पारिभाषा, अनावश्यक गुंतागुंतीचे निर्णय शास्त्र लागू करणे वेळ खाऊ आणि खर्चिक आहे. अनेकांना नेमक कुठून सुरुवात करावी हेच कळत नाही.

सदर अभ्यासामध्ये याच विषयावर सखोल चर्चा केली आहे जेणे करून संवर्धन अभ्यासकांना निर्णय घेण्यास मदत होऊन पर्यावरण संवर्धनाची व्यवहार्यता सुधारेल.

अभ्यासकांचा असा दावा आहे की चांगल्या परिणामांची सुरुवात निर्णयांचे व्यवस्थापन करणाऱ्या घटकांमध्ये दडली आहे. प्रत्येक घटकांचा सखोल विचार व्हावा. या प्रक्रियेला संरचित निर्णय घेणे म्हणतात. यामध्ये विज्ञानाला केंद्रस्थानी ठेवले जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात आलेल्या या अभ्यासात ऑस्ट्रेलिया, कॅनडा, संयुक्त राष्ट्र आणि पर्यावरणीय वैज्ञानिकांचा अनुभव मांडण्यात आला आहे.

**याचा मुख्य हेतु –**

१. पर्यावरण संवर्धनाच्या निर्णयासाठी एक सोपा प्रवेशमार्ग प्रदान करणे, जेणेकरून संवर्धनाचे अवघड निर्णय अधिक सोयीस्कर होतील;

२. वैविध्यमय निर्णयात प्रवेश करणारे आणि त्याची अंमलबजावणी करू शकणारे याची सांगड घालणे.

३. पर्यावरण क्षेत्राच्या महत्त्वपूर्ण मूल्यमापनासाठी पाया निर्माण करणे.

४. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी क्षेत्र आणि निर्णय घेण्याच्या पद्धतींबद्दल चर्चेला उत्तेजन देणे.

पर्यावरण संरक्षणासाठी घ्यावे लागणारे निर्णय खालील घटकांनुरूप करता येतात.

१. आपल्याला पर्यावरणाच्या नेमक्या कोणत्या घटकाचे संवर्धन करायचे आहे याची निश्चिती करा.

२. साध्य करायचे महत्वाची मूल्ये निर्दिष्ट करा.

३. महत्वाची मूल्ये प्राप्त करण्यासाठी आवश्यक व उपलब्ध पर्याय ओळखा.

४. महत्त्वाच्या मूल्यांवर पर्याय कसे अवलंबून आहेत याचा अंदाज घ्यावा.

५. दोलायमान परिस्थितीचे (ट्रेड–ऑफचे) मूल्यांकन करा.

६. त्यामधून साध्य होणारा सर्वोत्तम पर्याय निवडा.

वरील सहा पायऱ्याद्वारे आपण योग्य निर्णयावर काम करीत आहोत आणि महत्वाची सर्व मूल्ये ओळखली गेली आहेत याची खातरजमा होते. ही प्रक्रिया वेगवेगळे पर्याय तपासून पाहण्यास देखील मदत करू शकते. हाती असलेल्या माहितीसह या चरणांमधून वेगाने पुढे गेल्यास योग्य पर्याय समोर येऊ शकतो, तेव्हा निर्णय घेतला जाऊ शकतो.

◆

मूळ इंग्रजी लेखिका–विक्टोरिया हेमिंग
आणि इतर सहकारी

**अनुवाद – राघवेंद्र वंजारी**
मोबा. ९०२८७६९१८२.